म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ९३३८




REFBK-0014440

चारित्र
अनु.क्र. ७०५२

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळांक
अनुक्रम ५२८ वि.
क्रमांक १२३८ नों. दि.

भारताचे रणझुंजार माला : पुष्प २ रे

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. १०८८८०
ठाणे

# पहिला बाजीराव

REFBK-0014440
REFBK-0014440

लेखिका
सौ. शशिकला माधव ओक
बी. ए. (ऑनर्स); बी. एड्.

प्रथमावृत्ति १९६५

मूल्य रु. १.२५

© विदर्भ मराठवाडा बुक कंपनी

मुद्रक
**वि. ग. माटे**
विश्वकर्मा मुद्रणालय
३९५ सदाशिव पेठ, पुणें ९.

प्रकाशक :
**अ. ज. प्रभु**
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३२० शुक्रवार पेठ, पुणें २.

प्रणाम

जयीं उजाळिल्या जीवांच्या ज्योति,
अन् तेजाळलें स्वदेश-मंदिर .
जीवित आपुलें मानुनि तृणावत्
मिळविली जयांनीं थोर दिगंता कीर्ति—
त्या नरवीरां रणझुंजारां
असोत अमुचे लाख प्रणाम

# प्रकाशकाचे दोन शब्द

आपल्या भारताची परंपरा थोर, संस्कृतीही थोर. हा देश ऋषिमुनींचा, तसाच थोर सम्राटांचा. शूरांनीं याची शान वाढविली; विद्वानांनीं याची मान उंचावली. कारागिरांनीं याला वैभवसंपन्न केलें; कष्टकऱ्यांनीं याच्या मातीचें सोनें केलें.

असा आहे आपल्या भारताचा थोर इतिहास. अशोक–समुद्रगुप्तांनीं त्याचीं पानें रंगविलीं आहेत. प्रताप–शिवाजींनीं त्याला सोनेरी किनार चढविली आहे. लाल–बाल–पाल या त्रिमूर्तींच्या त्रिगुणात्मक कर्तृत्वाच्या फुलोऱ्यानें तो फुलला आहे; आणि गांधी–सुभाषांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वानें तो तेजाळला आहे.

आम्हीही त्यांच्या प्रयत्नांत सहभागी होऊं इच्छितों. आमचें लक्ष्य संस्कार. आमची दृष्टि भावी पिढीवर खिळलेली. आम्हांला आमची भावी पिढी सर्व दृष्टींनीं सुदृढ व्हावीशी वाटते. ती ज्ञानी व्हावी तशी बलवानही व्हावी. ती बुद्धिवादी व्हावी तशी झुंजारही व्हावी. ती यत्नवादी व्हावी तशी श्रमवादीही व्हावी.

तरी पण आज आम्हांला हवे आहेत रणझुंजार. केवळ पोषाखी नकोत. वृत्तीचे हवेत. त्यासाठीं आमचा हा उपक्रम. आमचे हे रणझुंजार अखिल भारताचे प्रतिनिधि आहेत. ते कोणा एका विशिष्ट जातीचे वा पंथाचे नाहींत. त्यांचा परिचय करून घ्या व त्यांची झुंजार वृत्ति आपल्या अंगीं बाणवा.

आमचे बाल आणि तरुण वाचक या रणझुंजारांचें सहर्ष स्वागत करतील अशी आम्ही आशा बाळगतों.

आमच्या या उपक्रमाला अनेक मित्रांनीं साहाय्य केलें आहे. त्यांतही विशेष आपुलकीनें साहाय्य करणारे पुण्यांतील प्रथितयश इतिहास-संशोधक व शिव-शाहीर श्रीमान् बाबासाहेब पुरंदरे यांचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. त्याबद्दल त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत. तसेंच ही माला गुंफण्याच्या कामीं ज्या ज्या मित्रांचें आम्हास वा लेखकांस साहाय्य झालें त्या त्या सर्वांचें ऋण व्यक्त करून आम्ही आमचें हें निवेदन पुरें करितों.

— प्रकाशक.

## पहिला बाजीराव


१ बाळ तसा काळ
२ हिंदुस्थानची मसलत करितों
३ अस्तनींतला निखारा
४ देशद्रोही तितुके कुत्ते
५ राखो बाजी लाज
६ मोंगल्यांची गुंज फुटली!
७ शत्रूंवर चौफेर मात,—पण—
८ असा होता बाजीराव

# प्रकाशकाचे दोन शब्द

आपल्या भारताची परंपरा थोर, संस्कृतीही थोर. हा देश ऋषिमुनींचा, तसाच थोर सम्राटांचा. शूरांनीं याची शान वाढविली; विद्वानांनीं याची मान उंचावली. कारागिरांनीं याला वैभवसंपन्न केलें; कष्टकऱ्यांनीं याच्या मातीचें सोनें केलें.

असा आहे आपल्या भारताचा थोर इतिहास. अशोक–समुद्रगुप्तांनीं त्याचीं पानें रंगविलीं आहेत. प्रताप–शिवाजींनीं त्याला सोनेरी किनार चढविली आहे. लाल–बाल–पाल या त्रिमूर्तींच्या त्रिगुणात्मक कर्तृत्वाच्या फुलोऱ्यानें तो फुलला आहे; आणि गांधी–सुभाषांच्या अलौकिक व्यक्तिमत्त्वानें तो तेजाळला आहे.

आम्हीही त्यांच्या प्रयत्नांत सहभागी होऊं इच्छितों. आमचें लक्ष्य संस्कार. आमची दृष्टि भावी पिढीवर खिळलेली. आम्हांला आमची भावी पिढी सर्व दृष्टींनीं सुदृढ व्हावीशी वाटते. ती ज्ञानी व्हावी तशी बलवानही व्हावी. ती बुद्धिवादी व्हावी तशी झुंजारही व्हावी. ती यत्नवादी व्हावी तशी श्रमवादीही व्हावी.

तरी पण आज आम्हांला हवे आहेत रणझुंजार. केवळ पोषाखी नकोत. वृत्तीचे हवेत. त्यासाठीं आमचा हा उपक्रम. आमचे हे रणझुंजार अखिल भारताचे प्रतिनिधि आहेत. ते कोणा एका विशिष्ट जातीचे वा पंथाचे नाहींत. त्याचा परिचय करून घ्या व त्यांची झुंजार वृत्ति आपल्या अंगीं बाणवा.

आमचे बाल आणि तरुण वाचक या रणझुंजारांचें सहर्ष स्वागत करतील अशी आम्ही आशा बाळगतों.

आमच्या या उपक्रमाला अनेक मित्रांनीं साहाय्य केलें आहे. त्यांतही विशेष आपुलकीनें साहाय्य करणारे पुण्यांतील प्रथितयश इतिहास-संशोधक व शिव-शाहीर श्रीमान् बाबासाहेब पुरंदरे यांचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. त्याबद्दल त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत. तसेंच ही माला गुंफण्याच्या कामीं ज्या ज्या मित्रांचें आम्हास वा लेखकांस साहाय्य झालें त्या त्या सर्वांचें ऋण व्यक्त करून आम्ही आमचें हें निवेदन पुरें करितों.

— प्रकाशक.

# ऋण

खरंच मी ऋणी आहे. फार फार ऋणी आहे.

कुणाची ? आणि कशासाठीं ? — सांगतें हं.

माझ्या थोर भारतमातेची मी ऋणी आहे. अगदीं पहिलें ऋण हें मानतें मी. तिच्या पवित्र कुशींत मीं जन्मलें. तिच्या विशाल अंगावर मीं खेळलें, बागडलें. तिच्याच अन्नावर मी पोसलें, लहानाची मोठी झालें.

सुजला, सुफला, सस्यश्यामला अशी ती माझी थोर माता. थोर थोर ऋषि-मुनींना जन्म देणारी, वीर-वीराङ्गनांना प्रसविणारी, ती माझी माता. उत्तुंग गिरिशिखरांवर विराजमान झालेल्या देवदेवतांच्या पुण्यपदन्यासानें पुनीत झालेली ती माझी माता — तिचें थोरपण मीं काय वर्णावें ? अन् तिचें ऋण मीं काय फेडावें ? मग माझा हा अल्पसा प्रयत्न, ही माझी छोटीशी कृति ! कशासाठीं ? तें ऋण फेडण्यासाठीं नव्हे. त्या ऋणाची जाण जागती ठेवण्या-साठीं आहे ती.

आणखी कुणाकुणाची ऋणी आहें मी ? माझ्या मातापित्यांची मी ऋणी आहें. त्यांनीं मला केवळ जन्म दिला नाहीं. त्यांनीं मला खूपखूप दिलें आहे. शब्दांच्या पलीकडचें आहे तें. खरं सांगूं ? माझे वेडेवाकुडे शब्दसुद्धां माझे नाहींत. माझ्या मातापित्यांचीच देणगी आहे ती. ही कृति माझी खरी. पण ती घडविणारे हात मात्र त्यांचे आहेत. त्यांचं हें ऋण मी कसें फेडूं ?

पण मला ह्या ऋणांतून कधींच मुक्त व्हायचें नाहीं.

हें ऋण आहे म्हणूनच मी आनंदांत आहें.

तें ऋण नसतें तर मी सुस्त झालें असतें, निष्क्रिय झालें असतें. तें ऋण मी मानतें म्हणूनच माझ्या भारतमातेच्या सुपुत्रांचें, विशेषतः तिच्या रणझुंजारांचें हें जीवनदर्शन, माझ्या कुवतीप्रमाणें मी तें घडवीत आहें.

आमचे प्रकाशकमित्र श्री. प्रभु यांना रणझुंजारांचा फार अभिमान. त्यांनीं या कृतीला साकार केलें. ह्या दर्शनाचें सर्व श्रेय त्यांचें आहे. त्यांचेंही माझ्यावर हें एक ऋणच नव्हे का ?

— लेखिका.

## खंदा सेनानी बाजीराव

### शाहिराचा मुजरा —



रावबाजी पुण्यामध्यें येऊन, हातावर घेऊन, निघाले शीर ।
प्रारंभीं पाहिलें जनस्थान रघुवीर ॥

नेमाड, माळवा मुलूख, करून सरसलूख, मोडिले वीर ।
मेवाडचे राजे न धरती धीर ॥

गढमंडळ बुंदेलखंड, डंबईत अखंड राहून थंड, सही केलें ।
प्रतापें करून या जगांत नांव मिळविलें ॥

— शाहीर प्रभाकर

थोरले बाजीराव — जन्म : इ. सन १७००
मृत्यु : इ. सन १७४०

## १ बाळ तसा काळ

**मर्दुमकीचें बाळकडू :—** ' आई ' या दोन अक्षरांतच केवढा अर्थ भरला आहे ! मांगल्याचें, पावित्र्याचें, नितांत प्रेमाचें आणि वात्सल्याचें मूर्तिमंत प्रतीक म्हणजे आई ! आणखी काय तिची थोरवी सांगायची ? तिचें वर्णन करणें खरोखर अशक्य आहे. आईच आपल्या कुशींतल्या इवल्याशा बाळाला फार मोठ्या पदावर नेऊन बसवीत असते. इतिहास-काळाला विचारून पहा. तो तुम्हांला जिजाबाई, राधाबाई ह्यांसारख्या थोर मातांच्या थोरवीची प्रचीति निश्चितच आणून देईल. चिमुकल्या शिवबाच्या मनांत अंकुरलेलें शौर्याचें रोपटें चांगलें फोंफावें म्हणून जिजाबाईनें जातीनें त्याला शिक्षण दिलें. आणि तोच शिवबा पुढें स्वतंत्र महाराष्ट्राचा एकमेव छत्रपति झाला ! असेच प्रयत्न राधाबाईनें, थोरल्या बाजी-रावांच्या आईनें, आपल्या लाडक्यासाठीं केले. ही स्त्री आपल्या शूर आणि गुणी बाळांच्या उत्कर्षासाठीं अहोरात्र झटली. बाजीराव आणि चिमाजी यांना तिनें स्वतः शिक्षणाचे पहिले धडे दिले. म्हणूनच कोंकणच्या किनाऱ्यावरील वाळूंत गांवांतल्या मुसल-मानांच्या पोरांचीं घोडीं बनवून त्यांच्या पाठीवर स्वार होणारा लहानगा बाजीराव पुढें हिंदुपदपातशाहीचा पंतप्रधान आणि कसलेला सेनापति म्हणून हिंदुस्थानांत चौफेर दौडत राहिला. जिथें जिथें तो गेला, तिथें तिथें तो कीर्तिरूपानें उरून राहिला. हें सारें घडलें तें त्याला मिळालेल्या बाळकडूमुळेंच. राधाबाईनें

जणूं आपल्या दुधांतूनच त्याला मर्दुमकीचें बाळकडू पाजलें होतें !

**तो काळच असा होता :**—प्रत्येक काळाच्या इतिहासांत त्याचें प्रतिबिंब पहायला सांपडतें. त्या त्या काळच्या संस्कृतीचें, सामाजिक आणि राजकीय स्थितीचें हुबेहूब चित्र आपल्याला त्याच्या इतिहासांत बघायला मिळतें. थोरल्या बाजीरावांचा काळ ह्या साऱ्याला साक्षी आहे. तो काळच असा होता कीं लेखणीपेक्षां तलवारच अधिक जवळची वाटावी अन् कित्येकांनीं कानावरचा बोरू उतरून भाला तलवार हातीं धरावी. महाराष्ट्राच्या अंगणांत चिमुरड्या पोरांनींसुद्धां इवल्याशा तलवारी घेऊन लुटुपुटुची लढाई खेळावी अन् लुटुपुटुच्या शत्रूंवर विजय मिळवावा. दुसऱ्या कोणत्याहि खेळांत त्यांना मुळीं गोडीच वाटूं नये.

थोरल्या शिवाजीमहाराजांपासून महाराष्ट्रांत चैतन्याचें नवें वारें खेळूं लागलें होतें. त्या वाऱ्यानें मावळ्यांच्या उघड्यानागड्या पोरांपासून तो मोठमोठ्या सरदारांपर्यंत सर्वांना पुरतें वेढून टाकलें होतें. हातांतला नांगर दूर सारून मावळे शेतकरी भालाबरचीच पसंत करूं लागले होते. ब्राह्मणांनासुद्धां वेदांतलीं चार अक्षरें बडबडण्यापेक्षां घोडे उडवीत मर्दुमकी गाजविणें बरें वाटत होतें.

छत्रपतींच्या काळाचीच छाया बाजीरावांच्या काळावर पडली होती. त्यांतूनाहि थोरल्या बाजीरावांचा पिंडच मुळांत असा होता कीं त्यांना आपल्या पित्याप्रमाणें लेखणी बहाद्दर म्हणवून घेण्यापेक्षां समशेर बहाद्दर म्हणवून घेण्यांत अभिमान वाटे ! त्यामुळें बाळपणींच रामकृष्णांसारख्या, भीमार्जुनांसारख्या,

जन्मानें ब्राह्मण असूनहि अजिंक्य वीर ठरलेल्या प्रतापी परशुरामासारख्या शूरांच्या कथा ज्यानें ऐकल्या त्या चिमुकल्या बाजीरावाच्या मनांत लेखणीपेक्षां तलवारच अधिक भरली यांत नवल काय ?

बाजीरावाला बाळपणीं लिहिण्यावाचण्याचें उत्तम शिक्षण मिळालें होतें. त्याबरोबरच त्याला घोड्यावर बसणें, तलवार चालविणें, भालाफेंक यांसारखें सर्व प्रकारचें लढाऊ शिक्षण मिळालें होतें. त्याचबरोबर हेंहि खरें आहे कीं बाजीराव आणि चिमाजी यांना बाराव्या वर्षापासून मोहिमांवर नेऊन बाळाजीनें, त्यांच्या पित्यानें त्यांच्या रणकौशल्याला बाळपणापासूनच वाव दिला. म्हणूनच ही राम-लक्ष्मणांची जोडी पेशवाईच्या काळांत आपल्या शौर्यानें अमर झाली ! बाजीराव अन् चिमाजी ह्या एवढ्याशा पोरांना मोहिमांवर नेण्यांत बाळाजींची मुत्सद्देगिरीच अधिक दिसून येते. ह्याच अनुभवाच्या जोरावर बाजीराव–चिमाजी अल्पावधींतच शूर आणि मुत्सद्दी म्हणून नांवलौकिकाला चढले.

**छत्रपति शाहूमहाराज** :—छत्रपति शाहू अठरा वर्षें मोगलाच्या नजरकैदेंत होते. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर ते या कैदेंतून मुक्त झाले. तारुण्याचा हा मोलाचा काळ मुसलमानी वातावरणांत गेल्यामुळें त्यांच्या मनावर शिवछत्रपतींच्या परंपरेला न

## २ हिंदुस्थानची मसलत करितों

शोभणारे असे अनेक अनिष्ट संस्कार झाले होते. ते मनानें पुरते दुबळे बनले होते. मोंगल बादशहा व त्यांचे सुभेदार यांच्या बाबतींत त्यांना चमत्कारिक सहानुभूति वाटूं लागली होती. त्यामुळें स्वराज्याच्या या शत्रूंना ठेचून व त्यांचा नायनाट करून स्वराज्याचा विस्तार करण्यास ते समर्थ नव्हते. त्यांच्या अंगीं स्वाभिमान, तडफ, मर्दपणा यांचा योग्य परिपोष झालाच नव्हता. या गुणांचा वारसा त्यांचे वडील, त्यांचे आजोबा यांच्याकडून त्यांना पुरेपूर मिळाला असला, तरी हे सर्व गुण गंजून जावेत यासाठीं औरंगजेबानें सर्व प्रकारची काळजी घेतली होती. शाहू-राजांना मुसलमानी गोषाच्या बाहेर जाऊं दिलें जात नव्हतें. गोषांत तारुण्य घालविलेला हा दुर्दैवी राजा मराठेशाहीचें वैभव कसें वाढविणार ?

पण शाहूमहाराजांच्या ठिकाणीं एक मोठा गुण होता. त्यांना माणसांची फार चांगली पारख होती. म्हणूनच ते बाळाजी विश्वनाथासारख्या कर्तबगार पुरुषाची पेशवेपदावर नेमणूक करू शकले. इतकेच नव्हे तर सर्व राज्यसूत्रें त्यांनीं पेशव्यांच्या हातीं दिलीं. याचा परिणाम अतिशय चांगला झाला. बाळाजी विश्वनाथानें धडाडीनें आणि मुत्सद्दीपणानें वागून स्वराज्य बळकट केलें आणि स्वराज्याला बादशाही मान्यता मिळवून दिली. शाहूमहाराजांनीं बाळाजीची तडफ ओळखली, म्हणूनच हें महान् कार्य तडीस गेलें.

आतां काळ पालटला होता. मराठ्यांचें स्वराज्य स्थिर झालें होतें. मोंगल बादशाही खिळखिळी होऊं लागली होती. बाद-

शहाच्या सुभेदारांमध्यें बेदिली माजली होती. ते स्वार्थानें आंधळे झाले होते आणि त्यापायीं आपापसांत झगडत होते. मराठ्यांची सत्ता वाढविण्यास ही सर्व परिस्थिति अनुकूल होती. तिचा फायदा घेऊन, शिवरायांचें हिंदुपदपातशाहीचें स्वप्न साकार करणारा हात शाहूमहाराजांना हवा होता. त्यांच्या आणि मराठेशाहीच्या सुदैवानें बाळाजी विश्वनाथाचा मुलगा बाजीराव याच्यासारखा खंदा वीर त्यांना लाभला. आणि हवा होता तसा हात मिळून हिंदुपदपातशाही रूप घेऊं लागली.

**सामोपचार कीं चढाई ?:—** पेशवेपदावर बाजीरावाची निवड झाली ही गोष्ट अगदीं योग्य झाली. पण बाजीरावाच्या कर्तबगारीला पूर्ण वाव मिळाला नाहीं. किंबहुना त्याची जागोजाग अडवणूक झाली हेंहि आपल्या लक्षांत येईल. छत्रपतींचा दुबळे-पणा हेंच या गोष्टीचें मुख्य कारण होतें. कसें तें पहा.

मराठी राज्याचा विस्तार करायचा तर बादशहाशीं व त्याच्या सुभेदारांशीं लढा करणें आवश्यक होतें. त्यांना जिंकल्याखेरीज नवीन प्रदेश स्वराज्यांत येणार कसा ? पण छत्रपतींचें धोरण पडलें सामोपचाराचें. बादशहाला दुखवूं नये, त्याच्या सरदारांशीं सलगीचीं बोलणीं करावींत, शक्य तों युद्धप्रसंग टाळावेत असा शाहूमहाराजांचा बाजीरावामागें नेहमीं लकडा असे. या उलट बाजीरावाचें धोरण तर सर्वस्वी चढाईचें होतें. निजाम काय किंवा वजीर काय सर्वच मोंगल अंमलदार उलटच्या काळजाचे, दुष्ट आणि कपटी होते. हें बाजीराव पूर्णपणें जाणून होता. त्यांच्याशीं

वागतांना सौजन्याचा कांहींहि उपयोग नव्हता. तेथें 'धटासि धट' आणि 'उद्धटासि उद्धट' होण्याची समर्थ रामदासांची व्यावहारिक शिकवणच उपयोगी पडणार होती. बाजीरावानें आपला सफेजंगी हात कधीं मागें घेतला नाहीं. तरीपण तो तितक्या सफाईनें चालवूं शकला नाहीं ही गोष्ट खरी.

**पेशवेपदावर आल्याबरोबर :**— बाजीरावाला आपलें चढाईचें धोरण यशस्वी करून दाखविण्यांत आणखी एक मोठी अडचण होती. ती म्हणजे छत्रपतींच्या भोंवतीं पिंगा घालणारे जुने सरदार. हे सरदार म्हणजे 'म्हातारीं खोडें' झाली होती, त्यांची उमेद मेली होती. धाडसी वृत्ति नष्ट झाली होती. त्यामुळें घरांत बसून राजकारणें करावींत असें त्यांना वाटे. हे सरदार स्वत: घरीं स्वस्थ बसले असते तरी हरकत नव्हती. पण पुढें जाणाऱ्याचे पाय मागें ओढण्याची नीच वृत्ति त्यांच्या ठिकाणीं असल्यामुळें बाजीरावाच्या कामांत त्यांनीं अनेक वेळां अडथळे आणले. बाजीरावाला पेशवेपदच मिळूं नये ही त्यांची इच्छा. त्यासाठीं त्यांनीं शाहूमहाराजांचे कान कमी फुंकले नाहींत. त्यांचें म्हणणें असें, "बाजीरावसाहेब बहुत उद्दाम प्रकृतीचे. अवघा वेळ शिपाईगिरींत मग्न. राज्यकारभार चालवावयास सबुरी असावी, तो भाव नाहीं." यामुळें ते या पदाला उपयोगी नाहींत. शिवाय आधीं घर सांभाळा, मग मुलुखगिरी करा' अशी ह्या जुन्या सरदारांची मसलत असे. बाजीरावाला ती कशी रुचणार ?

पण बाजीरावानें त्यांना दिलेलें उत्तर मोठें मार्मिक आहे.

" पूर्वीं मोठीं मोठीं कार्यें वडिलीं केलीं, तशीं न करावीं तरी मोठीं पदें कशाला धरावी ? प्रतिनिधींनीं घरची मसलत करावी. आम्हांस सनदा मात्र द्याव्या. राज्य साध्य करतों. थोरले महाराजांचा संकल्प हिंदुस्थान काबीज करावें, ऐसा राहिला. यास्तव आर्वी हें साध्य करावें आणि संकल्प शेवटास न्यावा. म्हणून किलिजखान याचाहि शह राखून **आम्ही हिंदुस्थानची मसलत करितों.** "

## ३ अस्तनींतला निखारा

**दिल्लीवर नजर :**—बाजीरावाच्या बोलण्यांत आवेश होता. तडफ होती. गरुडासारखी उंच उंच भरारी मारण्याची ईर्ष्या होती. शाहूमहाराज बाजीरावाच्या त्या वीरश्रीच्या बोलण्यानें भारावून गेले. ते म्हणाले, "शाबास ! बाळाजीपंत नानांचे उदरीं तुम्ही जन्मलां हें युक्त आहे. तुम्हांसारखे कर्ते पदरीं असतां हिमालयापलीकडील्हि किन्नरखिंडीचें राज्य साधतां येईल. तुम्ही हिंदुस्थानप्रांतीं जावें. "

महाराजांनीं दिलेल्या या शाबासकीमुळें बाजीरावालाहि नवीन स्फुरण चढलें. त्याचा उत्साह शतगुणित झाला व तो महाराजांचा आशीर्वाद घेऊन आपल्या कार्यासाठीं बाहेर पडला.

बाजीरावाची नजर दिल्लीवर होती. पण दिल्ली काय जवळ होती ? मारली घोड्याला टांच कीं पोंचला दिल्लीला ? आणि घेतलें

दिल्लीचें राज्य ? छे, इतकी सोपी नव्हती ही गोष्ट. दिल्लीच्या वाटेवर अडचणींचे प्रचंड पहाड अस्ताव्यस्त पसरले होते. ते उल्लंघून जाण्याची धमक बाजीरावाच्या ठिकाणीं होती हें खरें. पण एकटा बाजीराव किती करूं शकणार ? मराठमंडळांतील कांहीं प्रमुख सरदार बाजीरावाशीं सहकार्य करण्यास मुळींच तयार नव्हते. विशेषतः श्रीपतराव प्रतिनिधि, सेनापति त्र्यंबकराव दाभाडे शाहूमहाराजांचा मानलेला मुलगा फत्तेसिंग भोंसले आणि रघूजी भोंसले ही चांडाळ चौकडी बाजीरावाच्या विरुद्ध असे साताऱ्यांत राहून छत्रपतींचें मन बाजीरावाविषयीं कलुषित करण्याची एकहि संधि ते वायां दवडीत नसत. छत्रपतिसुद्धां कधीं कधीं ह्या चौकडीच्या आहारी जात असत आणि बाजीरावाच्या कार्यांत निष्कारण अडथळा आणीत. त्याला कित्येकदां हातीं घेतलेलें काम टाकून साताऱ्यास यावें लागे आणि त्याचे श्रम वायां जात.

तरीपण घरच्या या शत्रूंचें बळ बाजीरावानें ओळखलें होतें. त्यामुळें त्यांचा विरोध सहन करून आपलें कार्य तडीस नेणें त्याला फारसें जड गेलें नाहीं. त्यानें ह्या जुन्या सरदारांची मुळींच दखल घेतली नाहीं. उलट त्यांच्यापैकीं जे स्वार्थासाठीं राष्ट्रद्रोह करूं पाहात होते, त्यांना त्यानें चांगली शिक्षा दिली. ह्या संबंधींची हकीगत पुढें येणारच आहे. राणोजी शिंदे, उदाजी पवार, मल्हारराव होळकर यांच्यासारखे नव्या तडफेचे सरदार त्यानें तयार केले. त्यांच्याच मदतीनें श्रीरंगपट्टणपासून दिल्लीपर्यंत त्यानें आपला जरीपटका मोठ्या ऐटींत नाचविला. शिंदे—होळकर हे

त्याचे बाळपणचे सवंगडी. त्याच्या जीवाला जीव देणारे आणि खांद्याला खांदा लावून लढणारे. अशी कितीतरी तरुण मंडळी त्याच्या निशाणाखालीं जमा झाली. त्यानें आपल्या डोळ्यांपुढें ठेवलेलें हिंदुपदपातशाहीचें स्वप्न साकार होण्याचीं चिन्हें दिसू लागलीं.

**बाजीरावाचे शत्रू:—** बाजीरावाला हें कार्य तडीस नेतांना बाहेरच्या अनेक लहान मोठ्या शत्रूंना तोंड द्यावें लागलें. दिल्लीचा बादशहा हा त्याचा खरा मोठा शत्रु. बादशाही खिळखिळी झालेली असली तरी त्याचे अनेक सुभेदार निरनिराळ्या ठिकाणीं पसरले होते. त्यांच्यापाशीं मोठमोठ्या फौजा, प्रचंड तोफा व भरपूर दारूगोळा असे. त्याच्या जोरावर ते त्यांच्या सुभ्यामध्यें भलतेच शिरजोर झाले होते.

ह्या सर्व सुभेदारांमध्यें मस्तवाल झालेला सुभेदार म्हणजे निजाम. बादशहाच्या कृपेमुळें त्याला दख्खनची सुभेदारी मिळाली खरी, पण ‘निष्ठा’ ह्या शब्दाशीं त्याचा काडीचा संबंध नसल्यामुळें तो बादशहाशीं फटकून वागत असे. मराठ्यांचा तर तो कट्टा हाडवैरी होता. इतकेंच नव्हे तर मराठ्यांच्या शेजारीं राहून त्यांच्याशीं अखंड शत्रुत्व करणारा तो अस्तनींतला निखारा होता.

मराठ मंडळांतील सर्व सरदारांमध्यें एकटा बाजीराव निजामाला पुरा ओळखून होता. हा निखारा वेळींच विझवला नाहीं तर मराठेशाहीचें हें भव्य शरीर तो जाळील, पोळील अशी बाजीरावाची पक्की खात्री झाली होती. निजाम हा सामान्य शत्रु

नव्हता. दुष्टपणाबरोबर कपट आणि विश्वासघात या दोन दुर्गुणांशीं त्याची दोस्ती होती. सतत मराठ्यांच्या नाशासाठीं टपलेला हा त्यांचा शेजारी सारी दख्खन घशाखालीं घालूं पाहात होता. त्याला विरोध फक्त मराठ्यांचा. म्हणून मराठे निजामाच्या डोळ्यांत सारखे सलत होते. मराठ्यांमधली दुही ही त्याला पर्वणीच होती. या दुहीचा फायदा घेऊन मराठशाहीला आंतून पोखरण्याचा उद्योग त्यानें सतत चालविला होता. मराठ्यांनीं त्याला कितीदां तरी चोपला. तरीपण पुन्हां पुन्हां डोकें वर काढून तो पेशवाईला पुरून उरला. अर्थात् यांत त्याच्या स्वतःच्या कर्तबगारीपेक्षां त्याच्या नशिबाचाच भाग अधिक होता, असें दिसून येईल.

सलामी :— पेशवेपदावर आल्यावर बाजीरावानें प्रथम सर्व परिस्थितीचें नीट निरीक्षण केलें आणि आपल्या मनाशीं कांहीं निश्चय करून ठेवले निजामाला ठेंचणें हा त्यांतला एक प्रमुख निश्चय होता. लवकरच बाजीरावाची घोडदौड सुरू झाली. त्यानें खानदेश, गुजराथ, माळवा ह्या प्रदेशांत धुमाकूळ घातला. हा प्रदेश मोंगलांच्या अंमलाखालीं होता. बाजीरावाच्या तलवारीचें पाणी पाहूनच तेथील अंमलदार घाबरून गेले. ते मराठ्यांना निमूटपणें चौथाई देऊं लागले.

ह्याचवेळीं निजामानेंसुद्धां बादशहाविरुद्ध बंड केलें होतें. म्हणून बाजीरावानें त्याच्याशीं वरकरणीं सलोखा करण्याचा डाव रचला. निजाम पक्का ढोंगी होता. बाजीरावाचा कावा त्यानें

ओळखला. पण त्यालाहि त्या वेळीं मराठ्यांशीं भांडण करावयाचं नव्हतें. म्हणून तोहि वरकरणी त्यांच्याशीं सलोखा करण्यास तयार झाला. त्यानें बाजीरावाला आपल्या दरबारीं येण्याची विनंती केली. पण निरोप मात्र असा खुबीनें पाठविला कीं, "बरोबर फौजफांटा आणूं नये, सड्या स्वारीनेंच यावें."

बाजीरावाची हिंमत मर्दाची होती. तो चार–पांच हुजरे बरोबर घेऊन निजामाच्या भेटीस जाण्यास तयार झाला. बाजीराव हैद्राबादेस पोंचतांच निजामानें सामोरें जाऊन त्याचें भव्य स्वागत केलें. दरबारांत गेल्यावर तेथेंहि त्याचा मोठा सन्मान केला. हा सर्व स्वागतसोहळा पार पडल्यावर निजाम व पेशवे यांच्यांत राजकारणासंबंधीं कांहीं बोलणीं सुरू झालीं. बोलतां बोलतां मध्येंच निजाम म्हणाला, "बाजीरावसाहेब, तुम्ही आतां आमच्या हातांत सांपडलां आहांत. आम्ही तुम्हांला कैद केलें तर ते तुमचे शिंदे होळकर कुठें आहेत?" बाजीराव गालांतल्या गालांत हंसला आणि म्हणाला, "निजामसाहेब, तुम्ही दगाफटका कराल हें संभवत नाहीं. तरीपण तुमच्या मनांतच असेल तर माझे शिंदे–होळकर येथेंहि प्रकट होतील. जिथें बाजीराव, तिथें शिंदे–होळकर. पहायचंं आहे तुम्हांला?" बाजीरावानें टाळी वाजविली. त्याबरोबर हुजऱ्याच्या वेषांत बाहेर उभे असलेले शिंदे–होळकर आंत आले आणि पेशव्यांना मुजरा करून समोर उभे राहिले. हें पाहून निजाम चांगलाच खजील झाला. बाजीरावाशीं कपट खेळणें किती धोक्याचें आहे, हें त्याला कळून चुकलें.

**पालखेड :—** निजाम व पेशवे यांच्यांत तात्पुरता सलोखा झाला. पण तो फार काळ टिकूं शकला नाहीं. निजामानें मराठ्यांना



जिथें बाजीराव, तिथें शिंदे–होळकर

चौथाई व सरदेशमुखीचे हक्क कबूल केले होते. पण पुढें कांहीं दिवसांनीं त्यानें ते नाकारले. इतकेंच नव्हे तर बाजीराव माळव्यांत गेलेला पाहून त्यानें श्रीपतराव प्रतिनिधीशीं दोस्ती केली आणि मराठ्यांच्या दरबारांत फूट पाडण्यांत यश मिळविलें. त्यानें कोल्हापूरच्या संभाजीला चिथावणी देऊन शाहूविरुद्ध उठविलें. बाजीरावाला ही गोष्ट समजतांच तो ताबडतोब सातार्‍याला आला.

त्यानें निजामाकडे खंडणीची मागणी केली. तेव्हां धूर्त निजामानें त्याला उत्तर पाठविलें, "शाहू आणि संभाजी यांपैकीं खरे छत्रपति कोण तें अगोदर ठरवा. आणि मग आम्ही खंडणी देऊं." निजामाचें हें उत्तर ऐकून शाहूमहाराजांनासुद्धां अतिशय चीड आली आणि त्यांनीं पेशव्यांना निजामावर चालून जाण्याची आज्ञा दिली.

बाजीरावाला तरी हेंच हवें होतें. तो आपलें सैन्य घेऊन एकदम निजामाच्या मुलखांत शिरला. तो कसलेला सेनापति होता, गनिमी काव्यानें लढण्यांत निष्णात होता. त्यानें निजामाला हुलकावण्या देऊन चांगलेंच फसविलें. हूल दाखवीत दाखवीत त्यानें त्याला चौफेर पळविलें. त्याचा प्रदेश उध्वस्त करून त्याला आणखी चिडविलें. निजाम एवढा कसलेला सरदार, पण तोसुद्धां बाजीरावाच्या जाळ्यांत चांगलाच अडकला. पारधी जसा आपलें सावज चहूंकडून हुसकून आपल्याला हव्या त्या ठिकाणीं कोंडींत आणतो, अगदीं तसाच डाव बाजीरावानें योजिला आणि निजामाला पालखेडजवळच्या खिंडींत कोंडलें. निजामाच्या सैन्याची उपासमार होऊं लागली. प्यायला पाणीसुद्धां मिळेना. जागा तर इतकी अडचणीची कीं, उभें राहून लढणें अगदीं अशक्य होतें. शेवटीं निजामाचा नाइलाज झाला. आणि मराठ्यांच्या सर्व अटी मान्य करून त्यानें कशीबशी आपली सुटका करून घेतली. बाजीरावाच्या मनांतून निजामाला सोडावयाचें नव्हतें. ही सापाची जात पुरती ठेंचली पाहिजे, असें त्याचें मत होतें. पण भोळे शाहूमहाराज

निजामाच्या कळवळ्यानें गहिंवरून गेले आणि त्यांनीं निजामाला सोडून देण्याची बाजीरावाला आज्ञा दिली. निजाम सुटला, पण सापासारखा मनांत डंख धरूनच !

**भोपाळ :—** असेच कांहीं दिवस गेले. निजामाच्या सर्व कारवाया पुन्हां सुरू झाल्या होत्या. कधीं चंद्रसेन जाधवाला छत्रपतींविरुद्ध उठव, तर कधीं दाभाड्याला पेशव्याविरुद्ध चिथावणी दे. कधीं पेशव्याविरुद्ध गायकवाडाचे कान फुंकावे, तर कधीं प्रतिनिधीला लांच देऊन कारस्थानें करण्यास लावावें. हे त्याचे उद्योग एकसारखे चालू होते. पण बाजीराव त्याच्या या सर्व उद्योगांना पुरून उरला. त्यानें त्याचीं सर्व कारस्थानें हाणून पाडलीं.

बाजीरावाची खरी कर्तबगारी दिसून येते ती इथेंच. घरांतून, बाहेरून सर्व बाजूंनीं विरोध होत असतांना तो डगमगला नाहीं. त्यानें दिल्लीवरील आपली नजर ढळूं दिली नाहीं. घरच्यांचा बंदोबस्त करीत निजामासारख्या विश्वासघातकी शेजाऱ्याच्या दुष्ट कारवायांचा निकाल लावीत बाजीराव दिल्लीपर्यंत पोचला. त्याच्या भीमथडी तट्टांनीं यमुनेचें पाणी पोटभर पिऊन आपली तहान भागविली. बाजीरावाच्या शूर सैनिकांनीं श्रीरंगपट्टणपासून दिल्ली-पर्यंतच्या प्रदेशांत आपल्या तुफानी घोडदौडीनें लोकांवर जबर-दस्त वचक बसविला. दिल्लीच्या मोंगलांची तर गूंज फुटली. मराठ्यांच्या जिवंत पराक्रमाच्या प्रत्यक्ष दर्शनानें बादशहा भयभीत झाला. त्यानें बादशाहीच्या रक्षणासाठीं आपल्या सर्व सुभेदारांना

ग्रं. क्र. १४४४०

तांतडीचे निरोप पाठवून दिल्लीला बोलावलें. अर्थात् त्यांत निजामहि होताच.

मराठ्यांविरुद्ध हात उचलण्याची निजामाला ही आणखी एक संधि मिळाली. तो भली मोठी फौज घेऊन उत्तरेंत निघाला. काय तो त्याचा त्या वेळचा आवेश! बाजीरावाचा पुरता निकाल लागणार, असेंच त्याच्या आवेशावरून वाटे. पालखेडची फजिती बहुतेक तो विसरून गेला असावा. कदाचित् असेंहि असेल की, उत्तरेकडच्या सपाट मैदानांत आपल्या प्रचंड सेनासागरापुढें मराठे उभेसुद्धां राहूं शकणार नाहींत, अशी त्याची समजूत झाली असावी, नव्हे खात्रीच वाटत असावी. म्हणून त्यानें जोरानें दंड थोपटले.

पण झाली काय गंमत. त्याच्या दंड थोपटण्याचा आवाज हवेंत उमटलाहि नसेल, एवढ्यांतच बाजीरावानें त्याला अचानक भोपाळच्या गढींत कोंडलें. निजाम बाजीरावाला मैदानांत गांठणार होता. पण बाजीरावानें त्याला मैदानांत उतरण्याची संधीच दिली नाहीं. वास्तविक निजाम भोपाळच्या जवळ आला, तेव्हां बाजीराव खूप दूर होता. तो इतक्या लवकर खालीं येऊन आपल्याला वेढील याची कल्पनाहि निजामाला नव्हती. बाजीरावाचें खरें रणकौशल्य यांतच दिसून येतें. शत्रूला कल्पना नसतांना त्याला अचानक गांठून कोंडणें हाच तर गनिमी कावा. घोडदौडींत तर बाजीरावाचा हात धरणारा कुणी नव्हता.

झालें! पुन्हां पालखेडचीच आवृत्ति. निजामाचें दिल्लीकडील

आणि हैद्राबादकडील दळणवळण पूर्णपणें तुटलें. धान्याचा सर्व सांठा संपला. हत्ती–घोड्यांना वैरण मिळेनाशी झाली. एक दिवस तर त्यांना झाडांच्या साली आणि लव्हाळे चारावे लागले. गनिमी काव्यांत निष्णात असलेले मराठे सैनिक रात्रीं अपरात्रींसुद्धां निजामाच्या सैन्यावर छापा घालूं लागले. त्यामुळें दिवसा बाहेर पडतां येईना आणि झोंप मिळेना. अशी स्थिति झाली. निजामानें बादशहाला कळवून पत्र लिहिलें व त्याची मदत मागितली. पण नुकताच कांहीं दिवसांपूर्वीं मराठ्यांनीं दिल्लींत घुसून बादशहाच्या तोंडाला आणलेला फेंस अजून वाळला नव्हता. तेव्हां बादशहा काय निजामाला मदत करणार ? निजामानें दुसऱ्याहि कित्येक सुभेदारांना मदतीला बोलावलें. पण मराठ्यांविरुद्ध चालून जाण्याचें साहस कुणालाच करवलें नाहीं.

मराठे चांगलेच पेटले होते. कोंडींत सांपडलेला असतांनाहि निजाम कारवाया करतो, हें पाहून ते भयंकर चिडले. त्यांनीं निजामावर सर्व बाजूंनीं हल्ला चढविला. उपासमारीनें हवालदिल झालेले निजामाचे लोक मराठ्यांच्या तुफानी माऱ्याला कसें तोंड देणार ?

शेवटीं याहि वेळेला निजामाचा नाइलाज झाला आणि त्यानें मराठ्यांशीं अत्यंत अपमानास्पद असा तह केला. त्यानें मराठ्यांच्या वाटेला पुन्हां कधींहि न जाण्याचें वचन तर दिलेंच, शिवाय मराठ्यांनीं आतांपर्यंत मिळवलेल्या सर्व प्रदेशांवरील मराठ्यांचे

मालकी हक्क त्यानें मान्य केले. मराठ्यांना भलीमोठी खंडणी देण्याचें त्याला कबूल करावें लागलें तें निराळेंच.

भोपाळच्या या लढाईमुळें मराठ्यांची मान खूपच उंच झाली. हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याहि सत्तेपेक्षां मराठे अधिक वरचढ ठरले. शिवाय भोपाळचा विजय हा बाजीरावानें मनाशीं योजिलेल्या हिंदुपदपातशाहीचा पहिला जाहीरनामा ठरला.

मराठ्यांच्या अस्तनींतला हा निखारा पुरता विझण्याच्या बेतांत होता. बाजीरावानें तो विझवलाहि असता. पण मराठशाहीचें दुर्दैव हेंच कीं, शाहूमहाराजांची भोळी भावना ऐनवेळीं निजामाच्या रक्षणाला आली आणि हा अंगार मराठ्यांच्या साम्राज्याला सतत चटके देत राहिला.

## ४ देशद्रोही तितुके कुत्ते

दुही हा महाराष्ट्राला शापच आहे कीं काय कुणास ठाऊक ! मराठ्यांच्या इतिहासांत ह्या दुहीनें विलक्षण थैमान घातलेलें दिसतें. मराठे शूर, पराक्रमी व महत्त्वाकांक्षी लढवय्ये होते. पण दुहीमुळें त्यांच्यातील हे अव्वल गुण कित्येकदां मातीमोल ठरले व त्यामुळें मराठशाहीचें अतोनात नुकसान झालें. शिवछत्रपतींनीं मोठ्या कष्टानें उभारलेलें स्वराज्य आणि संताजीपासून बाजीरावापर्यंत अनेक मराठे वीरांनीं आपल्या रक्तामांसाचें खतपाणी घालून पोसलेलें साम्राज्य अल्पायुषी ठरलें, याला कारण केवळ मराठ्यांमधील दुही हेंच होय.

बाजीरावाला सुरवातीपासूनच दुहीच्या या भुतानें भयंकर छळलें होतें. केवळ बाजीराव होता, म्हणूनच या भुतापासून मराठ्यांचा बचाव झाला. त्याच्या ठिकाणीं दुसरा कोणी लेचापेचा असता, तर मराठ्यांचा इतिहास इथेंच संपला असता. शाहूच्या भोंवतालीं सदैव घुटमळणारी चौकडी तुम्हांला माहीतच आहे. बाजीरावानें स्वपराक्रमानें मिळवलेली लोकप्रियता आणि छत्र-पतींच्या दरबारांत त्याचा नेहमीं होणारा सन्मान त्यांच्या डोळ्यांत सारखा सलत असे. प्रथमपासूनच त्यांचें बाजीरावाशीं छुपे वैर होतें. जेव्हां जेव्हां त्यांना संधि मिळे, तेव्हां तेव्हां हे चौघेहि बाजीरावाविरुद्ध कारस्थानें करण्यास मागेंपुढें पाहात नसत.

सेनापति त्रिंबकराव दाभाडे हा तर बाजीरावाचा उघड द्वेष करीत होता. वास्तविक बाळाजी विश्वनाथाच्या खांद्याला खांदा लावून लढणाऱ्या खंडेरावाचा हा मुलगा. बापाच्या कमाईच्या पुण्याईमुळें तो सेनापति झाला. कदाचित् लढण्याच्या कामांत इतर मराठ्यांप्रमाणें तोहि पटाईत असेल. परंतु सेनापतिपदाचे कोणतेहि गुण त्याच्या अंगात नव्हते. शिवाय स्वार्थानें त्याचें मन किळस येण्याइतकें बरबटलेलें होतें, म्हणूनच कीं काय तो बाजीरावाला सतत पाण्यांत पाहात होता. कसलाहि विचार न करतां बाजी-रावाच्या नाशाला तो सदैव टपलेला असे. त्याच्या या खुनशी व दुष्ट वृत्तीमुळें त्याला आपल्या देशाचा व आपल्या राज्याचा पूर्णपणें विसर पडला होता. निजामासारख्या मराठ्यांच्या

हाडवैऱ्यानें या गोष्टीचा फायदा घेतला नाहीं तर नवलच म्हणावें लागेल. निजामाचें नशीब शिकंदर म्हणा किंवा मराठ्यांचें दुर्दैव म्हणा, निजामाला मराठ्यांच्या दुहीचा फायदा घेण्याची संधि लवकरच मिळाली.

मराठ्यांनीं गुजराथेंत आपले पाय बरेच घट्ट रोविले होते. वास्तविक गुजराथ प्रांतांत मुलूखगिरी करण्याची मुभा दाभाड्याला देण्यांत आली होती. पण दाभाड्यानें स्वतःच्या पराक्रमानें ती यशस्वी केली असती तर सबंध गुजराथ प्रांत त्यालाच मिळाला असता. दाभाडे सदैव शाहूच्या भोंवताली वावरत असे. सेनापति असूनहि कोणत्याहि मोहिमा त्यानें हातीं घेतल्या नाहींत. याउलट बाजीरावानें मोहिमांवर मोहिमा हातीं घेतल्या व त्या तडीस नेल्या. गुजराथची मोहीम यशस्वी करण्याचें बरेंचसें श्रेय बाजीरावाचेंच. त्यामुळें बाजीरावाला गुजराथेंत दाभाडेच्या बरोबरीनें वांटा मिळाला. ही गोष्ट दाभाड्याला रुचली नाहीं, तेव्हांपासून त्याचें पेशव्याशीं उघड वैर सुरू झालें.

निजामाला ही सुवर्णसंधि होती. त्यानें दाभाड्याला पेशव्यां-विरुद्ध चिथावलें व मदतीचें आश्वासनहि दिलें. निजामाशीं हात-मिळवणी करून दाभाडे आपल्या पेशव्याविरुद्ध कारस्थानें करूं लागलेला पाहून शाहूमहाराजांचें पित्त खवळलें. त्यांनीं बाजी-रावास दाभाड्याला पकडून आणण्याची आज्ञा दिली. त्याप्रमाणें बाजीरावानें आपला सर्व सरंजाम बरोबर घेऊन गुजराथेकडे कूच केलें. बाजीरावाच्या मनांतून दाभाड्याशीं लढाईचा प्रसंग

शक्यतों आणावयाचा नव्हता. त्याच्या फितुरीचें माप त्याच्या पदरांत टाकून त्याला राष्ट्रद्रोहापासून परावृत्त करण्याचाच बाजीरावाचा विचार होता. पण बाजीरावाचे सामोपचाराचे सर्व प्रयत्न फुकट गेले. निजामाच्या मदतीमुळें मस्तवाल झालेला दाभाडे बाजीरावाशीं कसल्याहि प्रकारचें बोलणें करण्यास तयार झाला नाहीं. उलट हवीं तशीं उद्धट उत्तरें देऊन त्यानें छत्रपतींचा अपमान केला. बाजीरावासारख्या स्वामिनिष्ठ सरदाराला ही गोष्ट कशी खपणार ? सामदामाचा उपयोग होत नाहीं असें पाहून बाजीरावानें दंडाचा उपाय योजिण्याचें ठरविलें. आणि तो बंडखोर दाभाड्यावर चालून गेला. प्रत्यक्ष युद्धाला तोंड लागण्यापूर्वी शेवटचा प्रयत्न म्हणून बाजीरावानें दाभाड्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. पण तोहि फसला. इतकेंच नव्हे तर दाभाड्यानें बाजीरावाच्या फौजेंतलि आवजी कवडे याच्या आघाडीच्या तुकडीवर अचानक हल्ला करून ती तुकडी कापून काढली. दाभाड्यानेंच केलेली ही आगळीक बाजीरावाच्या मानी मनाला विलक्षण झोंबली. त्यानें आपल्या सैन्याला दाभाड्यावर चालून जाण्याचे तावडतोब हुकूम दिले.

डभईजवळ लढाईची धुमश्चक्री सुरू झाली. स्वतः बाजीराव आपल्या सैन्याच्या आघाडीवर लढत होता. शत्रूच्या आघाडींत घुसून त्यानें शत्रूला आपल्या तलवारीचें पाणी भरपूर चाखविलें. त्याचें हें साहस जितकें अपूर्व तितकेंच धोक्याचेंहि होतें. बाजीरावच असलें साहस करूं जाणें ! लढाई रंगांत आली. बाजी

रावाच्या सैन्याचा जोर वाढूं लागला आणि सेनापतीच्या सैन्याची पांगापांग होऊं लागली. इतक्यांत कानशिलावर बंदुकीची गोळी लागून स्वत: सेनापति ठार झाला. त्याबरोबर सेनापतींचें सैन्य सैरावैरा पळत सुटलें. बाजीरावाची फत्ते झाली.

या लढाईचा महत्त्वाचा परिणाम एकच, तो म्हणजे राष्ट्र-द्रोहाला देहान्ताचेंच प्रायश्चित मिळतें, ही गोष्ट इतर बंड-खोरांच्या ध्यानांत आली व त्यामुळें बाजीरावाचा सर्वत्र वचक बसला. समर्थ रामदासांची शिकवण बाजीरावाच्या अंगीं पूर्ण बाणली होती. ‘ देशद्रोही तितुके कुत्ते ’ पुरते मारून टाकावे हा त्यांचा उपदेश बाजीरावानें तंतोतंत पाळला.

## ५ ‘ राखो बाजी लाज ’

**मराठशाहींतील राम-लक्ष्मण :—** कबिराचा एक दोहा आहे, “ मूरतसे कीरत बडी, बिन पंख उड जाय। मूरत तो जाती रही, कीरत कबहूँ न जाय। ” ह्या दोह्याला फार मोठा अर्थ आहे. मूर्तीपेक्षां कीर्ति ही मोठी असते, कारण ती पंख नसतांनाहि दूरवर फैलावूं शकते. शिवाय मूर्ति ही नाशींशी होणारी आहे, पण कीर्ति अमर आहे. पेशवा बाजीराव हा अत्यंत देखणा पुरुष होता. छत्रपति शिवाजीमहाराजांप्रमाणें तो आजानुबाहू होता असें म्हणतात. त्याचें पीळदार शरीर आणि मोहक बोलणें कुणालाहि मोहून टाकीत असे. पण बाजीरावाच्या या सुंदर मूर्तीपेक्षां त्यानें मिळव-

लेली कीर्तीच अमर होऊन राहिली आहे. त्याच्या चेहऱ्यावरील सौंदर्यापेक्षां त्याच्या मनगटांतील सौंदर्य हेंच अधिक आकर्षक आहे. त्यानें केलेली एकेक मोहीम ही त्याला कीर्तिशिखरावर नेणारी एकेक पायरी आहे.

बाजीरावानें आपल्या अवघ्या वीस वर्षांच्या कारकीर्दींत सबंध हिंदुस्थान आपल्या पराक्रमानें हादरून सोडला. त्यानें लहान-मोठ्या अनेक मोहिमा केल्या. त्याचा पाय सदैव घोड्याच्या रिकिबींत असे. त्यानें हातीं घेतलेली एकहि मोहीम अयशस्वी झाली नाहीं. बहुतेक सर्व मोहिमांमध्ये त्याच्या पाठीला पाठ लावून आलेला चिमाजीअप्पा सांवलीसारखा त्याच्याबरोबर असे. कित्येक मोठ्या मोहिमा चिमाजीनें एकट्यानेंच तडीला नेल्या आहेत. बाजीराव आणि चिमाजी ही कलियुगांतील राम–लक्ष्मणांची जोडी. अगदी लहानपणापासून त्यांचे परस्परांवर विलक्षण प्रेम होतें. दोघेहि एकत्र खेळले, एकत्र शिकले, आणि एकत्रच वाढले. मोठेपणींसुद्धां त्यांची जोडी कधीं फुटली नाहीं. चिमाजी बाजीरावाचा शब्द कधींही मोडत नसे आणि बाजीरावही चिमाजीचा सल्ला घेतल्याखेरीज रहात नसे.

साधारणपणें दसऱ्याच्या सुमुहूर्तावर बाजीराव आणि चिमाजी दोघेहि स्वारीवर निघत. निघतांना ते आपल्या कुलस्वामिनीचें दर्शन घेत. तसेंच आपल्या आईच्याहि पाया पडून तिचा आशीर्वाद घेण्यांस ते कधीं चुकत नसत. आईचा आशीर्वाद हाचि त्यांची खरी शिदोरी असे. त्यांची आई राधाबाई ही धार्मिक,

स्वदेशाभिमानी सुशिक्षित अशी थोर स्त्री होती. जणूं दुसरी जिजाबाईच. बाजीरावाच्या यशस्वितेचें बरेंचसें श्रेय तिच्याकडेंच जातें. बाजीराव आणि चिमाजी स्वारीवर निघाले कीं ती त्यांना उपदेशाच्या दोन गोष्टी सांगितल्याविना राहात नसे. ती त्यांना म्हणे, " अण्णा, अप्पा, पूर्वजांचा नांवलौकिक सांभाळा. त्यांची आठवण ठेवून नेहमीं पुढें चला. म्हणजे विजयी व्हाल. अपयश घेऊन कधीं मागें येवूं नका. त्याचबरोबर तुमचे शिपाई, चाकर-माणसें यांचीही काळजी घ्या. त्यांच्यावर पोटच्या पोराप्रमाणें माया करा. " बाजीरावानें आईचा हा उपदेश अगदीं तंतोतंत पाळला. तो आपल्या शिपायांमध्यें शिपाई होऊन राहात असे. त्यांच्यासारखाच ज्वारीची, मक्याचीं कणसें हातावर चोळून खात असे. आपल्या शिपायांची प्रेमानें विचारपूस करी. त्यांच्या सुख-दु:खांशी तो समरस होऊन जाई. त्यामुळें त्याचे शिपाईसुद्धां त्याच्यावर प्राणापलीकडे प्रेम करीत. सेनापति हा प्रथम रांगडा शिपाई असावा लागतो. केवळ सैनिकांना हुकूम सोडणारा तो हुकुमशहा असून चालत नाहीं. बाजीराव सेनापती होता तो खऱ्या अर्थानें.

**साम्राज्याचा कणा :**—बाजीरावाची दृष्टि प्रथमपासूनच दिल्लीकडे होती. बाजीरावाच्या महत्त्वाकांक्षी मनाला दिल्ली कांहीं फारशी दूर नव्हती. तरीपण दिल्लीला प्रत्यक्ष पोहोंचेपर्यंत त्याला बरेच महत्त्वाचे टप्पे साधावे लागले. पेशवेपदावर आल्यावर त्यानें पहिली झेप घेतली ती एकदम माळव्यांत. माळवा हा

साम्राज्याचा कणा मानला जात असे. कारण माळव्याचा प्रदेश समृद्ध होता. तेथून भरपूर वसूल सरकारला मिळत असे. याच कारणानें पेशव्यांचेंही लक्ष प्रथम माळव्याकडेंच गेले. पेशव्यांचे सरदार शिंदे, होळकर, पवार हे गुजराथ–माळव्यांतच मुलूख-गिरी करीत राहिले होते. हा प्रदेश हेंच त्यांच्या पराक्रमाचें पहिलें कार्यक्षेत्र व याच प्रदेशांत त्यांनीं आपल्या जहागिरी मिळविल्या होत्या. शिंद्यांची जहागिरी ग्वाल्हेर, होळकरांची इंदूर आणि पवारांची धार.

सन सतराशें तेवीसपासून माळव्याच्या राजकारणाला रंग चढूं लागला. कारण या वर्षीच पेशव्यांच्या या तीन शिलेदारांनीं आपलीं हीं तीन ठाणीं वसविलीं. हा प्रदेश दिल्लीच्या बादशहाच्या ताब्यांत होता. बादशहाच्यावतीनें कोणीतरी सुभेदार त्याच्यावर अंमल चालवी. गंमत अशी कीं हा सुभेदार प्रत्यक्ष माळव्यांत क्वचितच येई. बहुधा त्याचें सर्व वास्तव्य दिल्लींतच असे. माळव्याचा प्रत्यक्ष कारभार दुय्यम अंमलदारांच्या हातीं असे. हे अंमलदार स्वार्थानें भारलेले असत. सुभ्याचा बंदोबस्त करण्यापेक्षां स्वत:चीच तुमडी भरण्याकडेंच त्यांचें अधिक लक्ष असे. बाद-शहाच्या बहुतेक सर्व सुभ्यांची हीच अवस्था होती. बादशहाचें दुबळेपण होतें तें इथेंच. याच दुबळेपणाचा त्यांना फायदा घेता आला

बाजीरावाच्या सरदारांचा प्रवेश माळव्यांत झाला तेव्हांच सवाईजयसिंग हा तेथील सुभेदार होता. व त्याच्यातर्फे गिरिधर

बहादूदुर व दयाबहादूदुर हे दोघे बंधु कारभार पहात असत. बाजीराव आणि चिमाजीअप्पा व त्यांचे शिंदे–होळकर यांनीं माळव्यावर लागोपाठ इतक्या निकराच्या स्वाऱ्या केल्या कीं, बादशहाचे हे अंमलदार अगदीं टेकीस आले. पुढें गिरिधरबहादूदुर आणि दयाबहादूदुर हे मारले गेले. तेव्हां माळव्याची चौथाई आणि सरदेशमुखी मराठ्यांना देण्याशिवाय बादशहाला गत्यंतरच नव्हतें.

बाजीरावाच्या मनांतून हा सर्व प्रदेश आपल्या मालकीचा व्हावयास हवा होता, व बादशहाकडून तशा लेखी सनदा मिळाव्यात ही त्याची मागणी होती. परंतु बाजीरावाची ही मागणी एकदम मान्य होण्याची लक्षणें दिसत नव्हतीं. माळव्या-सारखा एवढा सधन प्रांत सुखासुखीं सोडून देण्याला बादशहा तरी कसा तयार होणार ? एकीकडे सनदा देण्याचीं भरगच्च आश्वासनें द्यायचीं आणि दुसरीकडून मात्र माळव्यावरील अंमल अधिक मजबूत करावयाचा, असा बादशहाचा कावा होता. बादशहानें सर बुलंदखान, महंमदखान बंगश यांच्यासारख्या मातब्बर सरदारांची माळव्यावर नेमणूक केली. तेव्हां हा कावा बाजीरावाच्या लक्षांत आला. त्याबरोबर त्यानें आपलें धोरण बदललें. त्यानें बादशाचा हा मुलख जिंकून घेण्याचें ठरविलें आणि त्यानुसार त्यानें आपल्या मोहिमा अधिक नेटानें सुरू केल्या. बादशाच्या या नामांकित सुभेदारांचासुद्धां मराठ्यांपुढें निभाव लागेना. मराठ्यांपुढें त्यांना माघार घ्यावी लागली. बाजीराव पक्का धोरणी

होता. त्यानें माळव्यांतील आपलें बस्तान पक्कें बसविलें खरें; पण वरपांगीमात्र आपण बादशहाचे सेवक आहोंत, असें तो भासवीत असे. त्यामुळें बादशाहीविषयीं भोळा भाव मनांत बाळगणारा शाहू आणि स्वत: दिल्लीचा बादशहा हे दोघेहि खूष राहिले.

**गजेंद्राची हांक** :— बाजीरावाच्या पराक्रमाच्या नौबती आतां हिंदुस्थानच्या कानाकोंपऱ्यांतून झडूं लागल्या होत्या. सबंध हिंदुस्थानांत एकटे मराठेच तेवढे सामर्थ्यशाली ठरले होते. त्यांचा प्रतिनिधि बाजीराव हा तर हिंदूंचा एकमेव रक्षणकर्ता मानला गेला होता. पुढें लवकरच या वीर पुरुषाला एका हिंदु राजाच्या हांकेला धांवून जावें लागलें. गजेंद्राची मगरीच्या जबड्यांतून सुटका करायला विष्णु नाहीं का धांवून आला, तसाच बाजीराव बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल याची हांक आल्याबरोबर त्याच्या रक्षणासाठीं धांवून गेला. राजा छत्रसाल हा ऐंशी वर्षांचा वृद्ध धार्मिक आणि सरळ स्वभावाचा होता. तो स्वातंत्र्यप्रेमी चंपतरायचा मुलगा. बुंदेलखंडाच्या स्वातंत्र्यासाठीं औरंगजेबाशीं लढतां लढतां चंपतराय धारातीर्थीं पतन पावला होता. त्या वेळीं छत्रसाल फक्त चौदा वर्षांचा होता. परंतु छत्रसालानें स्वातंत्र्याचें कंकण हातीं बांधून बापाचें अपुरें कार्य पुरें केलें. बुंदेलखंड स्वतंत्र झालें. छत्रसालानें दक्षिणेंत येऊन शिवाजीमहाराजांचीहि भेट घेतली होती. शिवरायानें त्याला आपल्या प्रेमाचें प्रतीक म्हणून एक सुंदर खड्ग बक्षीस दिलें होतें. त्या खड्गाबरोबरच स्वातंत्र्य व स्वधर्म

यांविषयींचें प्रेम व निष्ठा त्यानें महाराजांपासून घेतली नसती तरच नवल.

त्याच छत्रसालाच्या स्वातंत्र्यावर आतां गदा आली होती. बादशहाचा सुभेदार महंमदखान बंगष हा बादशहाच्या आज्ञेने बंडखोर राजांना शिक्षा करण्यासाठीं बाहेर पडला होता. बंगषानें आपला रोख पहिल्यानें बुंदेलखंडावर धरला. छत्रसालानें रजपूत राजांच्या मदतीनें प्रथम बंगषाला चांगलाच चोप दिला. पण पुढें बंगषानें युद्धाची कडेकोड तयारी करून छत्रसालावर जोराचा हल्ला चढविला. यावेळीं बादशहा व वजीर यांनीं बंगषाच्या मदतीला खूप मोठें सैन्य पाठविलें होते.

छत्रसालाचें सैन्य त्यामानानें फार कमी होतें. त्यामुळें त्याच्या सैन्याची पांगापांग होऊन स्वतः छत्रसाल जखमी झाला आणि बादशाही सैन्यापुढें हार खाण्याचा प्रसंग त्याच्यावर येऊन ठेपला.

इतक्यांत त्याच्या ध्यानांत आलें कीं दक्षिणेकडे बाजीराव पेशवा हा एक वीरपुरुष हिंदुधर्माचा मोठा अभिमानी असून हिंदुपदपातशाही स्थापन करण्यासाठीं झटत आहे. त्यानें बाजीरावाला लगेच पत्र पाठवलें व मोठ्या कळवळ्यानें आपली मुक्तता करण्याची विनंति केली.

**आणि हांकेला 'ओ':—** छत्रसालाचा निरोप येतांच बाजीरावानें एका क्षणाचाहि विलंब न लावतां आपल्या सैन्याला तयार होण्याची आज्ञा दिली. छत्रसालाची मुक्तता केल्याखेरीज पुण्याला भोजन करावयाचें नाहीं, अशी त्यानें प्रतिज्ञाहि केली.

आपली सुमारें पाऊण लाख फौज घेऊन तो अक्षरशः वायुवेगानें बुंदेलखंडाच्या सीमेवर येऊन थडकला. तेथें आल्यावर त्यानें छत्रसालाची गुप्तपणें भेट घेऊन त्याला धीर दिला. नंतर दोघांनींहि जैतापूर येथें तळ देऊन बसलेल्या बंगषाच्या सैन्यावर जोराचा हल्ला चढविला. त्याचा पराभव करून त्यास बुंदेलखंडाबाहेर पिटाळून लावलें.

बाजीरावाचा तो अद्भुत पराक्रम पाहून वृद्ध छत्रसालाच्या डोळ्यांचें पारणें फिटलें व त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रु ओघळूं लागले. त्यानें बाजीरावाला मोठ्या समारंभानें आपल्या राजधानींत नेऊन त्याचा गौरव केला. त्यानें त्याला आपला तिसरा मुलगा मानला व आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा त्याला बक्षीस दिला. ह्या हिश्श्यामध्यें झांशी व त्याच्या आसपासचा सालीना सव्वादोन लाखांचा मुलूख मोडत होता. याचवेळीं त्यानें पूर्वीच्या क्षात्र पद्धतीला अनुसरून मस्तानी नांवाची एक लावण्यवती स्त्री बाजीरावास अर्पण केली व भूमिदानाबरोबर कन्या दानाचें श्रेय मिळविलें.

बाजीरावाच्या दृष्टीनें हा विजय फार महत्त्वाचा होता. कारण दिल्लीच्या जवळ स्वतःच्या मालकीचा प्रदेश मिळाल्यामुळें दिल्लीवर चढाई करणें त्याला अतिशय सोपें जाणार होतें. त्यानें आपला शागीर्द गोविंद खेर यास बुंदेलखंडाच्या नव्या जहागिरीवर नेमलें व आपल्या पुढच्या योजनेची तयारी केली. हा खेर शागीर्द

असला तरी तो मोठा हुशार व शूर असून बाजीरावाच्या कसोटीस पूर्णपणें उतरला होता. गोविंदपंत बुंदेले या नांवानें त्यानें केलेली कामगिरी इतिहासांत प्रसिद्ध आहे. अशा रीतीनें 'राखो बाजी लाज' अशी छत्रसालाच्या मुखांतून हिंदूंच्या स्वातंत्र्यदेवीनें दिलेली हांक बाजीरावानें ऐकली व आपल्या अतुल पराक्रमानें शत्रूचा पूर्ण निःपात करून त्यानें तिचे रक्षण केलें.

## ६ मोंगल्यांची गुंज फुटली !

**आमच्या मागण्या ह्या :—** महंमदखान बंगषाच्या पराभवाची बातमी दिल्लींत येऊन थडकतांच बादशहाचें व त्याच्या सरदारांचें धाबें दणाणलें. त्याचा वजीर कमरुद्दिन व सरदार खानदौरान हे सर्व प्रबळ गणले गेलेले सरदार दिल्लींतच जमा झाले होते. मराठ्यांनीं गुजराथ, माळवा आणि बुंदेलखंड या सधन प्रदेशांवर आपला अंमल बसविलेला पाहून या सरदारांचें मस्तक फिरलें. वजीर कमरुद्दिनखान आणि खानदौरान यांच्यांत काडीचीहि कर्तबगारी नव्हती. सादतखान घमेंडखोर होता. त्यामुळें मराठ्यांचा समाचार कसा घेतां येईल, ही विवंचना बादशहाला लागली, तर नवल तें काय ? मराठे तरी असे वस्ताद ! पिसाटासारखे बादशहाच्या प्रदेशांत घुसत आणि बादशहाचे सुभेदार जागे होण्याच्या आंतच मन मानेल तशी लूट करून आपल्या प्रदेशांत परत जात.

पण आतां मराठ्यांना अधिक शिरजोर होऊं द्यायचें नाहीं, असें बादशहाच्या या तीन शेळपट सरदारांनीं ठरविलें. पण तिघेहि इतके सुस्त कीं तिघांनाहि सैन्याची तयारी करून बाहेर पडण्यास एका वर्षाहून अधिक काळ लागला. तोंपर्यंत शिंदे–होळकरांनीं आग्रा प्रांतसुद्धां लुटून फस्त केला.

आणखी एका गोष्टीमुळें बादशहाचें दुर्दैव बलवत्तर झालें होतें. बादशहाच्या दरबाराला शोभा आणणारे, पराक्रमी, पण बादशहाच्या गुलामींतच धन्यता मानणारे रजपूत सरदार बादशहाला फारसे अनुकूल राहिले नव्हते. त्यांचा कल मराठ्यांकडेच झुकूं लागला होता. सवाई जयसिंगानें तर मराठ्यांना माळव्याच्या सनदा ताबडतोब देऊन टाकाव्या, असा सारखा आग्रह चालविला होता. पण त्याच्या त्या आग्रहाचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं. मराठे दिल्ली-आग्र्याच्या आसपास येऊन थडकले. तरी मोंगल सरदारांचा दिमाख कायम होता. बादशहानें आपल्या या वरील त्रिकुटाला मराठ्यांचा मोड करण्याची आज्ञा दिली. मात्र हें त्रिकूट स्वारीवर निघण्याच्या अगोदर बादशहानें आपला वकील यादगारखान यास बाजीरावाशीं बोलणी करण्यासाठीं पाठविलें. पण बाजीराव म्हणजे ठकास महाठक होता. बादशहाचा चालढकलीचा डाव त्यानें ओळखला. त्यानें बादशहाच्या वकिलाला स्पष्टच सांगितलें कीं, "तुम्ही आजपर्यंत आम्हांला दिलेलें एकहि वचन पाळलेलें नाहीं. सबब आतां मागचे सर्व करार रद्द समजावेत. आतां आमच्या मागण्या ह्या—( १ ) स

माळवा प्रांत आम्हांला जहागीर म्हणून द्यावा. ( २ ) खर्चाबद्दल रोख ५० लाख रुपये द्यावे. ( ३ ) दक्षिणेंतील सहा सुभ्यांची सरदेशपांडेगिरी आम्हांस द्यावी. ( ४ ) मथुरा, काशी, गया आणि प्रयाग हीं तीर्थक्षेत्रें आमचीं म्हणून आमच्या स्वाधीन करावीत ! एवढ्या जबरदस्त अटी बादशहा कशा कबूल करील ? पण त्यानें दक्षिण सुभ्यांची सरदेशपांडेगिरी मात्र देऊन नवा दोन टक्के कर लावून दिला. अर्थात् ही एकच मागणी मान्य करण्यांत बादशहाचा डाव होता. कारण त्यामुळें निजाम व मराठे यांच्यांत धुसफूस निर्माण होणार होती. परंतु बादशहाचा हा डाव सफल झाला नाहीं. उलट, नव्या मोहिमेची तयारी करण्यासाठीं बाजीराव दक्षिणेंत आला व दसरा झाल्याबरोबर त्यानें ऐंशी हजारांची भलीमोठी फौज घेऊन उत्तरेकडे कूच केलें.

**म्हणे मराठे मोडले :**— इकडे बादशहानेंहि जोरानें तयारी चालविली होती. कारण बादशाहीचा हा प्रचंड परंतु पोकळ होऊं लागलेला डोलारा, बाजीरावाच्या जबरदस्त धक्क्यांपुढें फार काळ टिकाव धरणार नाहीं, याबद्दल त्याची खात्री पटली होती. आणि म्हणूनच ह्या काफरांचा समाचार घेण्यासाठीं आणि बादशाहीची इभ्रत राखण्यासाठीं आपल्या झाडून साऱ्या सरदारांना त्यानें सैन्यासहित मदतीस बोलाविलें. त्यांत निजामालाहि आमंत्रण होतें. निजाम तर सारखाच मराठ्यांच्या नाशाला टपलेला असे. आतां तर काय, बादशहानें आपण होऊन मराठ्यांविरुद्ध लढायला त्याला बोलाविलें होतें. निजाम उत्तरेकडे निघा-

लेला पाहून बाजीरावानें एक गंमत केली. आपली एक तुकडी त्यानें वऱ्हाड प्रांतांत ठेवली. त्या तुकडीनें असा धुमाकूळ घातला कीं त्यामुळें निजामाला कांहीं काळ थांबावें लागलें. तोंपर्यंत बाजीराव आपल्या तुफानी घोडदौडीमुळें चंबळेच्या तीरावर येऊन थडकला होता. तेथें तळ देऊन बसलेल्या मोंगली फौजेचा बाजीरावानें पराभव केला. मोंगलांच्या बाजूनें लढणाऱ्या अनुराधासिंगानें बाजीरावाशीं तह केला. त्यांत बाजीरावाला २० लाख रुपये आणि दहा हत्ती मिळाले.

बाजीरावानें पुढें कूच केलें. त्यानें मधेंच मल्हारराव होळकराला कांहीं फौज देऊन सादतखानावर पाठविलें. यमुनेच्या दुआबांत पलीकडील बाजूस जाऊन मल्हाररावानें झुकोहाबादेस वेढा दिला. तेथील अधिकाऱ्यानें मुकाट्यानें तह केला व खंडणी म्हणून एक हत्ती आणि दीड लाख रुपये मल्हाररावास दिले. नंतर आसपासच्या प्रदेशांत बरीच लुटालूट करून त्याची स्वारी सादतखानाचा समाचार घेण्यासाठीं वळली. मल्हारराव सादतखानावर प्रत्यक्ष स्वारी करणार नव्हता. बाजीरावाला मोंगल सैन्याला चुकवून दिल्लीकडे कूच करतां यावें यासाठीं केवळ हूल दाखविण्याचें काम मल्हाररावाला करावयाचें होतें. तें त्यानें अगदीं बेमालूम पार पाडलें. सादतखानाची फौज त्याच्यावर चालून येतांच त्याच्याशीं थोडी लढाई करून त्यानें तिथून पळ काढला. आणि तो गुपचूप यमुना उतरून बाजीरावाच्या फौजेंत सामील झाला.

इकडे सादतखानाला वाटलें कीं मराठे मोडले. त्यांचा आपण पराभव केला. त्यानें बादशहाला कळवूनसुद्धां टाकलें, " मराठे यांची फौज यमुना उतरून आली होती, ते बुडविली. मल्हारजी होळकर कामास आले. बाजीराव यांची तेच गत जाहाली. मराठे दक्षिणेंत पळाले. " सादतखानाकडून आलेली ही बातमी ऐकून बादशहाला इतका आनंद झाला कीं त्यानें दिल्लीमध्यें जल्लोष करण्याचे हुकूम सोडले. दिल्ली शहर बादशहाच्या जयनिनादानें नुसतें निनादून गेले.

सादतखान नुसती फुशारकी मारूनच थांबला नाहीं. त्यानें खानदौरानला मोठ्या तोऱ्यांत विचारलें, " आम्ही बाजीरावाची फौज मोडली, त्याला पळवून लावलें. अद्याप तुम्ही त्याची खुशामत करतां ? वकील ठेवून घेतला आहे तो कोण्या विचारे ? वकिलास निरोप देणें. " झालें. पेशव्यांचा वकील धोंडोपंत पुरंदरे यास निरोप देण्यांत आला.

इकडे सादतखानाच्या बातमीवर खूष झालेला बादशहा भोगविलासांत गर्क झाला होता. बाजीरावच कामास आला, आतां कशाची डर ? म्हणून त्यानें सर्वांना चैन करण्यास खुषीनें मुभा दिली. आधींच रामनवमीच्या उत्सवामुळें दिल्ली गजबजून गेली होती. त्यांतच त्या आनंदाचा जल्लोष. त्यामुळें प्रत्यक्ष बाजीराव आपल्या लष्करी सैन्यासह रामनवमीच्या जत्रेंतील दुकानें लुटून गेला, तरी बाजीराव आल्याची निश्चित् बातमी बादशहाच्या हातीं लागली नाहीं. खरोखरीच बाजीराव आला असून त्यानें

दिल्ली लुटली ही बातमी ऐकली अन् त्या नामर्द बादशहाच्या जिवाचा थरकांप उडाला. बाजीरावाला तोंड देण्याऐवजीं यमुनापार होऊन पळून जाण्याचाच विचार त्याच्या मनांत घोळूं लागला. निरनिराळ्या सुभ्यांचें मिळून एक लाखावर सैन्य त्या वेळीं दिल्लींत होतें. तें एकत्र आलें अन् त्यानें मराठ्यांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं. मराठे जिंकले !

दिल्लीवरची ही चढाईची मोहीम बाजीरावाच्या अजब रण-कौशल्याचें प्रतीक आहे. या मोहिमेमुळें एक अजोड सेनानायक म्हणून बाजीराव इतिहासांत अमर झाला. त्याच्या या तुफानी हल्ल्यानेंच 'मोंगल्यांची गुंज फुटली.'

**७ शत्रूंवर चौफेर मात, पण —**

**सिद्दी संपला :—** सिद्दी आणि पोर्तुगीज हे मराठ्यांचे सुरवातीपासूनचे शत्रू. सिद्दीचें राज्य जंजिऱ्याला आणि पोर्तुगीजांचें राज्य गोव्याला होतें. भारताचा सबंध पश्चिम किनारा आपल्या ताब्यात असावा, अशी दोघांचीहि फार इच्छा होती. पण मराठे कसले त्यांची इच्छा पूर्ण होऊं देतात ? म्हणून तर दोघेहि मराठ्यांवर जळफळत होते. संधि मिळाली कीं डोकें वर काढू पाहात आणि मराठ्यांच्या मुलखांत धुमाकूळ घालीत.

कान्होजी आंग्रे हा जोंपर्यन्त मराठ्यांच्या आरमाराचा प्रमुख होता, तोंपर्यन्त त्यानें सिद्दी किंवा पोर्तुगीज कुणाचीहि डाळ शिजूं दिली नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यानें सिद्दीला जंजिऱ्यांत आणि पोर्तुगिजांना गोव्यांत पुरतें डांबून टाकलें होतें. त्यांचें एखादें जहाज हळूच बाहेर पडलें, तरी कान्होजी त्याचा पुरता फन्ना उडवून टाकीत असे.

पण कान्होजी मरण पावला आणि ही स्थिति पालटली. त्याच्या मुलांमध्यें भांडणें सुरू झालीं. त्या वेळीं पेशवे उत्तरेकडच्या मोहिमेंत गुंतले होते. त्यामुळें आरमाराकडे त्यांचें थोडें दुर्लक्षच झालें. त्यामुळें सिद्दीचें आणि फिरंग्यांचे चांगलेंच फावलें. त्यांनीं मराठी मुलखांत शिरून मराठ्यांच्या प्रजेला छळायला सुरवात केली.

जंजिऱ्याला सिद्दिसात हा दुष्ट सिद्दी राज्य करीत होता. त्यानें कोंकणांत खूपच धुमाकूळ घातला. मराठ्यांचे किल्ले घेतले. आणि प्रदेशहि उध्वस्त केला. कोंकणांतील प्रजेकडून शाहूमहाराजांकडे तक्रारी येऊं लागल्या. सिद्दीच्या पुंडाव्याच्या बातम्या ऐकून शाहूमहाराजांना चीड आली. खरें म्हणजे पश्चिम किनाऱ्याचें रक्षण करण्याची जबाबदारी श्रीपतराव प्रतिनिधीवर होती. पण त्याच्या हातून ती नीटपणें पार पाडली जात नव्हती. हें पाहून शाहूमहाराजांनीं बाजीरावाला माळव्यांतून मुद्दाम बोलावून घेतलें आणि सिद्दीच्या बंदोबस्तासाठीं पाठविलें.

कोंकणांत गेल्यावर बाजीरावानें प्रथम आंग्रे मंडळींमध्यें समेट घडवून आणला. आणि सेखोजी आंग्रे याला ‘ सरखेल ’ म्हणून

नेमून टाकलें. त्यामुळें मराठ्यांच्या आरमाराला नेता लाभला आणि तें पुन्हां बळकट झालें. त्यामुळें पश्चिम किनारा मराठ्यांच्याच ताब्यांत राहिला.

इकडे जंजिऱ्यामध्यें सुद्धां बऱ्याच भानगडी सुरू होत्या. सिद्दीच्या सरदारांमध्यें तंटे सुरू झाले होते. या गोष्टीचा फायदा घेऊन बाजीरावानें कोंकणांत आल्याबरोबर सिद्दीला चांगलीच तंबी दिली. सिद्दी चपापला. परंतु सरदारांच्या आपापसांतील भांडणांमुळें त्याला आपली सर्व शक्ति बाजीरावाविरुद्ध एकवटतां आली नाहीं. बाजीरावानें सिद्दीचीं ठाणीं एकामागून एक अशीं सर करीत सिद्दीला पुन्हां जंजिऱ्याकडे पिटाळलें. बाजीरावानें जंजिऱ्याला वेढा दिला आणि किल्ल्यावर तोफांचा दणका सुरू केला. या वेळीं तोफा डागण्याचें काम स्वतः बाजीरावानें केलें असें म्हणतात. सिद्दी रहीम जंजिऱ्याच्या बाहेर आला, पण तो लगेच मारला गेला. सिद्दी अंबर, सिद्दी संबूल वगैरे सरदार जंजिरा सोडून अंजनवेलीकडे पळून गेले. तिकडेहि मानाजी आंग्रे यानें त्यांचा समुद्रांतून पिच्छा पुरविला. सिद्दीची चारही बाजूंनीं दामटी वळल्यामुळें तो बाजीरावाला शरण गेला. त्यानें जंजिऱ्यासुद्धां सर्व किल्ले बाजीरावाच्या ताब्यांत दिले सिद्दीकडे फक्त जंजिऱ्यालगतचा ५॥ महालांचा मुलूख राहिला. या मोहिमेंत विजय मिळवून बाजीराव उत्तरेकडे निघून गेला.

**पोर्तुगीज पळाले** :—पोर्तुगिजांचा बंदोबस्त करण्याचें काम बाजीरावानें चिमाजी अप्पावर सोंपविलें होतें. गोवा आणि वसई

हीं दोन पोर्तुगिजांचीं मुख्य ठिकाणें. वसईचा किल्ला तर अतिशय मजबूत आणि अवघड होता. परंतु चिमाजीअप्पानें शौर्याची शर्थ केली आणि तो किल्ला सर केला. पोर्तुगिजांना वसईतून हांकून लावलें. वसई फत्ते झाल्यामुळें आणि सिद्दीचाहि मोड झाल्यामुळें कोंकणांतील हिंदूंना अतिशय आनंद झाला. त्यांनीं हिंदुधर्माचें रक्षण करणाऱ्या बाजी-चिमाजींना मनापासून धन्यवाद दिले.

मराठ्यांच्या ह्या विजयामुळें मुंबईच्या इंग्रजांच्या छातींत धडकी भरली. हे इंग्रज लोक मराठ्यांचा द्वेषच करीत असत. पण मराठ्यांचे आरमार इतकें प्रबळ होतें कीं त्यापुढें त्यांचें कांहीं चालत नसे. मधून मधून ते सिद्दीशीं किंवा पोर्तुगिजांशीं हातमिळवणी करीत. परंतु आतां मराठ्यांनीं त्या दोघांचाहि पक्का बंदोबस्त केला होता. त्यामुळें इंग्रजांना गप्प बसण्याखेरीज दुसरा मार्गच नव्हता. उलट वरकरणीं त्यांनीं पेशव्यांशीं सख्यच केलें.

**मराठे भ्याले नाहींत :—** या सर्व मोहिमा संपवून बाजीराव पुण्याला परत येतो तोंच भारतावर आलेल्या एका मोठ्या संकटाची बातमी त्याच्या कानांवर आली. इराणचा क्रूर बादशहा नादिरशहा यानें दिल्लींत येऊन तिथें धुमाकूळ घातला होता. त्यानें दिल्लीचा बादशहा महंमदशहा यास कैद केलें होतें. वजीर खानदौरान यास ठार मारलें. नवाब साहिबखान आणि कित्येक सरदारांनाहि कैद केलें. नादिरशहाच्या सैनिकांनीं दिल्ली शहर लुटून फस्त केलें. हजारों लोकांचीं डोकीं उडवून तीं वेशीवर टांगलीं ! हजारों

प्रेतांचे मनोरे रचले ! या सर्व बातम्या ऐकून बाजीरावाला विलक्षण संताप आला. नादिरशहा हा सबंध भारताचा शत्रु आहे, त्यानें भारतावर क्रूर हल्ला केला आहे, अशा वेळीं गप्प बसणें ही गोष्ट लांछनास्पद आहे, असेंच बाजीरावाला वाटत होतें. त्यानें आपल्या सर्व मोहिमा रद्द केल्या. आणि उत्तरेंतून आलेल्या हांकेला प्रतिसाद देण्यासाठीं भलेंमोठें सैन्य घेऊन त्यानें तडक दिल्लीकडे कूच केलें.

बाजीरावाच्या स्वारीची चाहूल लागल्यामुळें असो किंवा दुसऱ्या कोणत्याहि कारणामुळें असो, नादिरशहा फार दिवस भारतांत न राहतां इराणला परत गेला.

**पण हादरले, कशामुळें :—** नादिरशहाचें हें संकट टळलें खरें, पण त्याहिपेक्षां कितीतरी भयंकर असें दुसरें एक संकट मराठशाही-पुढें उभें राहिलें. त्यानें मात्र मराठे चांगलेच हादरले. थोरले बाजीराव पेशवे यांचा एकाएकीं मृत्यु झाला. नादिरशहाच्या स्वारीवर जात असतांना वाटेंतच नर्मदेच्या कांठीं रावेरखेडा येथें थोड्याशा तापाला ते अचानक बळी पडले. मराठ्यांच्या हिंदुपद-पातशाहीच्या योजनेला याहून भयंकर धक्का दुसरा कोणता असणार ?

**२८ एप्रिल १७४० !:—** एक अत्यंत अभागी दिवस ! २७ एप्रिलची काळरात्र संपून क्षितिजाच्या कडा उजळत होत्या. दिवसाची स्वच्छ प्रभा फांकत होती. त्याचवेळीं तिच्या तेजांत आणखी एक तेजाची ज्योत विलीन होत होती. मराठ्यांच्या पाणावलेल्या डोळ्यांना तें तेज दिसत नव्हतें. अजूनहि त्यांच्या डोळ्यांत भयाण अंधःकार भरून राहिला होता.

## ८ असा होता बाजीराव —

थोरले बाजीराव गेले ! हिंदुपदपातशाहीचा नेता गेला ! महाराष्ट्राचा खंदा सेनानी गेला ! शाहूमहाराजांचा पराक्रमी उजवा हात कायमचा निखळून पडला. मराठे सैनिकांचा बाप नाहींसा झाला. मराठमोळ्या प्रजेचा प्रेमळ शास्ता गेला. शनिवारवाड्यांतला हा हिरा नर्मदेंत हरपला !

छत्रपति शिवाजीमहाराजांच्या नंतर बाजीरावाइतका कसलेला वीर, कल्पक सेनानी, हिंदुपदपातशाहीचें स्वप्न आमरण उराशीं बाळगणारा ध्येयनिष्ठ आणि तेजस्वी पुरुष महाराष्ट्रांत झालाच नाहीं. इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात, "मराठ्यांच्या इतिहासांत शिवाजीच्या पराक्रमाच्या खालोखाल, कदाचित् कित्येक बाबतींत शिवाजीच्यापराक्रमाच्या तोडीचीं अद्भुत कृत्यें बाजीराव बल्लाळाच्या हातून झालीं आहेत."

शाहूमहाराजांनीं हें अमोल रत्न त्याच्या बाळपणींच पारखून ठेवलें होतें. आणि म्हणूनच विरोधकांना न जुमानतां त्यांनीं

बाजीरावाला पेशवेपद दिलें. त्या वेळीं बाजीराव अवघा तेवीस वर्षांचा होता ! बाजीरावानेंहि आपल्या वीस वर्षांच्या कारकीर्दींत हिंदुस्थानची मसलत करून हिंदुपदपातशाहीचें थोरल्या महाराजांचें स्वप्न साकार करीत आणलें होतें. आपलें सारें आयुष्य त्यानें त्यासाठीं खर्ची घातलें होतें.

स्वारीवर असतांना त्याला सुखासीनतेचा, विलासांचा वा जातीपातींचा विसर पडत असे. तो फक्त आपल्या शिपायांना अन् तलवारीलाच ओळखी. भोजनाला पंचपक्वान्नें तर राहोच, परंतु साधें अन्नहि कित्येकदां त्याला लागत नसे. कडेच्या शेतांतलीं कणसें मोडून, घोड्यावर बसल्या बसल्याच हातावर चोळून दाणे तोंडांत टाकायचे आणि हिरवी मिरची तोंडीं लावायची.

बाजीराव दिसण्यांत रुबाबदार तसा मनानें दिलदार होता. त्याचा पोषाख नेहमीं साधा असे. पांढरा रंग त्याला फार आवडे. डामडौल, छानछोकी अन् ऐषआराम यांचा तो मनापासून द्वेष करी. शिपाईगिरी हा त्याचा एकमेव बाणा होता. घोड्यांचा त्याला भारी शोक. त्याच्या स्वारींत अरबी, काठेवाडी घोडे होतेच. तरीपण भीमथडी तट्टूहि त्याला फार फार प्रिय असे. अबलख रंगाच्या घोड्यावर स्वार होणाऱ्या बाजीरावाची ऐट काय सांगावी ? वीर्यशाली रघुराजाशींच त्याची तुलना होऊं शकेल.

बाजीरावाचें बोलणेंहि मोठें गोड व मोहक असे. त्याचे शिपाई त्याच्यावर जिवापलीकडे प्रेम करीत तें उगीच नव्हे. मागें राहून त्यांना नुसते हुकूम सोडणारा हुकूमशहा तो कधींच नव्हता. तो

मराठी ४४४०

सदैव त्यांच्यांतच राही. त्यांच्यासारखाच वागे. त्यांच्याशीं तो एकरूप होई. त्यांचीं सुखें ऐकून तो सुखावे. त्यांच्या दुःखांनीं तो दुःखी होई. तो नेहमीं त्यांच्या पुढें असे. दौडतांना आणि शत्रूच्या तलवारीचे घाव छातीवर झेलतांनाहि. असा होता बाजीराव. आपल्या सैनिकांवर पोटच्या पोरांप्रमाणें माया करणारा आणि त्यांच्याच बळावर अचाट साहसें करणारा !

छत्रपति शाहू बाजीरावाची योग्यता पुरेपूर जाणत होता. "एक लाख सैनिकांपेक्षां एकटा बाजीरावच मला अधिक प्रिय आहे." असें तो मोठ्या अभिमानानें सांगत असे. वीस वर्षें अखंड मर्दुमकी गाज़विणारा हा त्याचा लाडका पंतप्रधान जेव्हां वारला तेव्हां शाहूराजा ढसाढसा रडला. इतरांच्या दुःखाला तर सीमाच नव्हती. प्रत्यक्ष छत्रपतीला पोरका बनविणारा बाजीरावाचा मृत्यु ही मराठ्यांच्या वाढत्या स्वराज्यावर चालून आलेली एक भीषण आपत्तीच नव्हे का ?

बाजीराव गेला. पण त्यानें प्रकट केलेली झुंजारवृत्ति मेली नाहीं. बाजीरावाचें वैशिष्ठ्य हें कीं, त्यानें आपल्यासारख्याच रणझुंजारांची एक परंपरा निर्माण केली. शिंदे, होळकर, पवार हे तीन सरदार त्याच्याच तालमींत तयार झाले. या त्याच्या सरदारांनीं आपल्या अद्‌भुत पराक्रमानें अवघा भारत हलवून सोडला. अटकेवर झेंडे लावले. दिल्लीचा कारभारहि हातीं घेतला. मराठ्यांच्या या साऱ्या मर्दुमकीचें बीज बाजीरावानें रुजविलें ही गोष्ट इतिहास मोठ्या अभिमानानें सांगतो !

असा होता बाजीराव ! स्वतः रणझुंजार आणि भावी रणझुंजारांच्या महान् परंपरेचा जनक !

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम.......................... वि: ......................
.......................... ऑ: दि: ......................

REFBK-0014440